महाराष्ट्र शासन

क्रमांक : अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/साशि-१
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार इमारत, मुंबई ४०००३२
दिनांक : २ मे, २०१९

विषय :- मागणी क्र. W-९, ७६१०- शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे या अंतर्गत सन २०१९-२० करीता मंजूर तरतूदीचे वाटप.

संदर्भ : १. वित्त विभाग परिपत्रक क्रमांक : अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. ०१ एप्रिल, २०१९

ज्ञापन:- उच्च व तंत्रशिक्षण विभागातील (खुद्द विभाग व विभागांतर्गत क्षेत्रिय कार्यालये) शासकीय कर्मचाऱ्यांना घर विकत घेणे / बांधणे, मोटार वाहने, इतर वाहने खरेदी करणे व संगणक खरेदी करणे या करीता मागणी क्रमांक डब्ल्यू-९, प्रधान लेखाशिर्ष-७६१०, शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे या लेखाशिर्षांतर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता एकूण रुपये रुपये ३४,५५,१०,०००/- (रुपये चौतीस कोटी पंचावन्न लक्ष दहा हजार फक्त) एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.

२. वित्त विभागाच्या दिनांक ०१ एप्रिल, २०१९ च्या परिपत्रकान्वये सन २०१९-२० चा अंतरिम अर्थसंकल्प दिनांक २७ फेब्रुवारी, २०१९ रोजी विधानमंडळास सादर करण्यात आला आहे. हा अंतरिम अर्थसंकल्प असल्याने अतिरिक्त अर्थसंकल्प सादर करुन विनियोजन विधेयक मंजूर होईपर्यंतच्या एप्रिल, २०१९ ते जुलै, २०१९ या चार महिन्यांच्या कालावधीसाठी खर्च भागविण्याकरीता विधानमंडळाने "महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक, २०१९ मंजूर केले आहे. सदर विधेयकाचे आता अधिनियमात रुपांतर झाले असून ते महाराष्ट्र अधिनियम क्र.२ म्हणून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४ दि. ०८ मार्च, २०१९ मध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे.

३. त्यानुसार खुद्द विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील संचालनालयांना सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील रकाना क्र. ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे निधी मंजूर करण्यात येत असून सर्व नियंत्रक अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिनस्त कार्यालयांना निधी मंजूर/वितरीत करण्यापूर्वी वित्त विभागाच्या संदर्भाधीन परिपत्रकातील अटी व शर्तीची पूर्तता करावी. तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील नियमानुसार तसेच याबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार अग्रिम मंजूर करावे.

४. या प्रधानशिर्षाखालील मंजूर तरतूद लेखादानानुसार एप्रिल ते जुलै, २०१९ या चार महिन्यांच्या खर्चासाठी मंजूर करण्यात येत असून उर्वरित शिल्लक तरतूद या प्रयोजनार्थ प्रत्यक्षात मागणी, लाभार्थ्यांची यादी इत्यादी माहिती शासनास प्राप्त झाल्यानंतरच मंजूर करण्यात येईल.

५. या अनुदानाबाबत खर्चमेळाचे काम (Reconciliation) संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी करणे आवश्यक असून खर्चाचे एकत्रित आकडे या विभागाकडे व मा.महालेखापाल, महाराष्ट्र राज्य-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर यांना पाठवावेत. त्यांच्याशी संबंधित एकत्रित केलेली सर्व माहिती प्रपत्रामधून भरुन या विभागाकडे पाठवावी. तसेच संचालकांच्या नियंत्रणाखालील कोणत्याही कार्यालयाने खर्चमेळाची माहिती परस्पर शासनाकडे पाठवू नये, अशा सूचना संचालकांनी परस्पर द्याव्यात. प्रपत्रात मंजूरीचा आदेश क्रमांक व दिनांक तसेच अग्रिम काढल्याचा प्रमाणक क्रमांक व दिनांक, कोषागाराचे नांव इत्यादी तपशिलाचा अंतर्भाव केलेला असावा. खर्चमेळाचे बाबतीत वेळोवेळी लोकलेखा समितीला उत्तर द्यावे लागत असल्यामुळे याबाबत योग्य ती खबरदारी सर्व संचालनालयांनी घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(गी.नि.चव्हाण)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

*सोबत : विवरणपत्र*

प्रति,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), १/२, मुंबई/नागपूर
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व सहसचिव/उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, ग्रंथालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अवर सचिव (साशि-२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
कक्ष अधिकारी, (आस्था-१)/(रोखशाखा), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
कक्ष अधिकारी, (व्यय-५ / अर्थसंकल्प-८) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
निवड नस्ती, साशि-१

(शासन ज्ञापन क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र. ४२/साशि-१, दिनांक २मे, २०१९ सोबतची विवरणपत्र)

| अ क्र | उद्दिष्ट | सन २०१९-२० करीता मंजूर तरतूद |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | | (रु. हजारात) |
| | २०१- घर बांधणी अग्रीमे- (००)(०१) घर बांधणी अग्रीमे (७६१० १५२१) ५५ कर्जे व आगाऊ | |
| १ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग (खुद्द) | २७३३३.३३३ |
| २ | उच्च शिक्षण संचालनालय, पुणे | २५००० |
| ३ | तंत्र शिक्षण संचालनालय, मंबई | २५००० |
| ४ | ग्रंथालय संचालनालय, मुंबई | १३००० |
| ५ | कला संचालनालय, मंबई | १३००० |
| | **एकूण** | **१०३३३३.३३३** |
| | | |
| | २०२- मोटार वाहन खरेदी अग्रीमे- (००)(०१) मोटार वाहन खरेदी अग्रीमे (७६१० १५३९) ५५ कर्जे व आगाऊ रकमा | |
| १ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग (खुद्द) | २५०० |
| २ | उच्च शिक्षण संचालनालय, पुणे | २७०० |
| ३ | तंत्र शिक्षण संचालनालय, मंबई | २७०० |
| ४ | ग्रंथालय संचालनालय, मुंबई | १८००.००० |
| ५ | कला संच्यालनालय, मंबई | १६३३.३३३ |
| | **एकूण** | **११३३३.३३३** |
| | | |
| | २०३- इतर वाहन खरेदी अग्रीमे- (००)(०१) मोटार वाहन खरेदी अग्रीमे (७६१० १५४८) ५५ कर्जे व आगाऊ रकमा | |
| १ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग (खुद्द) | ४.६६७ |
| २ | उच्च शिक्षण संचालनालय, पुणे | १० |
| ३ | तंत्र शिक्षण संचालनालय, मंबई | १० |
| ४ | ग्रंथालय संचालनालय, मुंबई | ६ |
| ५ | कला संचालनालय, मंबई | ६ |
| | **एकूण** | **३६.६६७** |
| | | |
| | २०४- संगणक खरेदी अग्रीमे- (००)(०१) वैयक्तिक संगणक खरेदी अग्रीमे (७६१० १५४९) कर्जे व आगाऊ रकमा | |
| १ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग (खुद्द) | ६० |
| २ | उच्च शिक्षण संचालनालय, पुणे | १४३ |
| ३ | तंत्र शिक्षण संचालनालय, मंबई | १४३.६६७ |
| ४ | ग्रंथालय संचालनालय, मुंबई | ६० |
| ५ | कला संचालनालय, मंबई | ६० |
| | **एकूण** | **४६६.६६७** |